# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट १९८-२३ दिनांक २२/०६/२०२३

## मोटर सायकलची डिकी तोडुन त्यातील पैसे चोरी करणा-या सराईत आरोपीतास अटक करुन चोरी केलेली संपुर्ण रक्कम हस्तगत गुन्हे शाखा कक्ष ३, विरार यांची कामगिरी.

-------ooooo-------

विरार पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात दिनांक १७/०६/२०२३ रोजी दुपारी २.४५ वाजता चे दरम्यान फिर्यादी नामे श्री. किरण किसन पाटील यांनी त्यांच्या होंडा कंपनीची मोटारसायकलच्या डिकीमध्ये १,५०,०००/- रुपये रोख रक्कम ठेवुन युनियम बँक, जुना भाजीपाला मार्केट, विरार येथे सदरची मोटरसायकल पार्क केली असता कोणीतरी अज्ञात आरोपीत यांनी मोटारसायकलची डिकी तोडुन त्यातील वर नमुद रक्कम चोरी केलेबाबत विरार पोलीस ठाणेस फिर्याद दिल्याने विरार पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ५९७ /२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात गेल्या काही महिन्यांपासुन चोरीच्या घटनेत वाढ झाल्याने सदर घटनांची वरिष्ठांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीत यांचा शोध घेवुन गुन्हेस पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

सदर गुन्हे अनुषंगाने गुन्हे शाखा कक्ष-३. विरारचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रीक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे आधारे आरोपीत नामे सॅम्युल हेरल परेरा, वय - ५० वर्षे, रा. कासारवडवली, ठाणे पश्चिम, जि. ठाणे. यास गुन्हयातील चोरी झालेली वर नमुद संपुर्ण रक्कम व गुन्हया करते वेळी वापरण्यात आलेली इको कार असा एकुण ३,५०,०००/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असुन त्यास पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

नमुद आरोपीत यांचा पुर्व इतिहास पडताळुन पाहिला असता वर नमुद आरोपीताविरुध्द मुंबई, नवी मुंबई, पुणे, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाणेत अशाच प्रकारे २० पेक्षा जास्त गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, सागर बारावकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे, म.सु.ब सागर सोनवणे, गणेश यादव तसेच स.फौ. संतोष चव्हण, नेम सायबर सेल यांनी केली आहे.

----ooo----